| Add : appropriation if any | | | **V CASH AND BANK BALANCES** | | |
| Add/less : surplus/ deficit | 11,04,614.99 | | (a) Cash in hand | | |
| as per I/E Account ... ... | | 90,38,123.69 | (b) Bank Balance (Sch.E) ... ... | | 57,53,889.32 |
| **TOTAL RS.** | | 5,00,77,519.77 | **TOTAL RS.** | | **5,00,77,519.77** |

The above Balance sheet to the best of my belief contains a true account of the Funds and Liabilities and Assets of the trust

As per Our report of even date

Trustee: Place : Nagpur For **C.R.SAGDEO & CO**

S/d. P. M. Tayade Date : 29.10.2020 Chartered Accountants

Trust Address : Nagpur University Teachers Association Trust FRN 108959W

Sd/-**C.A. Sameer S. Wazalwar** (Partner)

Membership No. : 139162

himself was a member of the Regulations Drafting Committee of UGC."

**(६)** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्ष व सचिवांनी हे जे निवेदन दिनांक १३ जुलै २०१९ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांना दिले होते, त्यातील परिच्छेद ७ पुढीलप्रमाणे आहे. :-

**"7.** It is grossly illegal and unconstitutional for theUniversities in the State of Maharashtra to prescribe provisions contrary to the UGC Regulations-2018 and direct the colleges to implement it. Immediate and effective intervention by UGC is required to protect the Constitutional provisions. If the Constitutional and legal provisions, prescribed by the UGC Regulations-2018, are allowed to be encroached upon by the unauthorized, illegal and unconstitutional provisions prescribed by the Government Resolutions issued by the Department of Higher Education in the State of Maharashtra, it will create a total and aggravated chaos in the field of the Higher Education in the State of Maharashtra."

**(७)** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक २२ सप्टेंबर २०१९ रोजीच्या बैठकीत एक ठराव ***(यापुढे उल्लेख महासंघाचा ठराव)*** संमत करून विद्यापीठाच्या मा. कुलगुरूंनी घातलेला घोळ तपशीलाने मांडला होता. या ठरावाच्या *(P169NB2019)* प्रती उच्च शिक्षण विभागाला, सर्व मा.कुलगुरूंना व विद्यापीठ अनुदान आयोगाला पाठविण्यात आल्या होत्या. महासंघाच्या या ठरावातील परिच्छेद ८ व ८.१ पुढीलप्रमाणे होता :-

"**८.** एका विशेष व चमत्कारिक घटनाक्रमाचे तपशील नमूद करणे या कार्यकारी मंडळाला आवश्यक वाटते. "विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम १९५६" च्या कलम २६ व इतर तद्अनुषंगिक कलमांनी दिलेल्या अधिकारांचा वापर करून विद्यापीठ अनुदान आयोगाने १८ जुलै २०१८ ला पुढे जे रेग्युलेशन्स निर्गमित केले त्या रेग्युलेशन्सचा मसुदा अंतिम करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने सहा सदस्यांची एक मसुदा समिति दिनांक ३ ऑगस्ट २०१७ रोजीच्या आदेशान्वये (१७/१५४) स्थापीत केली होती. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे मा. कुलगुरू हे या समितीचे एक सदस्य होते. या समितीसमोर घटनेतील तरतुदी, संसदेने केलेला कायदा, विद्यापीठ अनुदान आयोगाची रेग्युलेशन्स करण्याची शक्ती व त्यांची बंधनकारकता याबाबतची सारी कागदपत्रे ठेवण्यात आलेली होती व रेग्युलेशन्स निर्गमित झाल्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने तसे पत्रही काढलेले होते. असे असतांना **त्या रेग्युलेशन्समधील फक्त उच्च शिक्षण विभागाने मान्य केला तेवढाच भाग अंमलात आणावा असे निदेश कुलगुरू निर्गमित करतात हे अत्यंत आश्चर्यकारक, विशेष व चमत्कारिक होय.** *(P171&172NB2019)*

**८.१** महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने दिनांक १४ ऑगस्ट २०१९ (१५५/१९) रोजी एक शासननिर्णय निर्गमित केला असून त्याअन्वये "शासननिर्णयाद्वारे अध्यापकांच्या सातव्या वेतन आयोगातील त्रुटींवर विचार करून शिफारशी करण्यासाठी" एक समिती गठीत केली आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे मा.कुलगुरू हे त्या समितीचे अध्यक्ष आहेत. **खाली नमूद केलेल्या दोन त्रुट्या 'उच्च शिक्षण विभागाच्या लक्षात आणून देण्याच्या धैर्याचा अभाव' एवढी एकच त्रुटी या त्रुटी समितीच्या लक्षात आली तरी सर्व त्रुट्या दूर होतील. :-**

(i) भारताच्या घटनेने केंद्रसूचीत समाविष्ट केलेल्या विषयांच्या बाबतीत संसदेने केलेला "कायदा व त्या कायद्याच्या अंतर्गत करण्यात आलेले उपविधान" यावर राज्यशासनाला दुरुस्त्या करण्याचा कोणताही अधिकार नाही.

(ii) राज्याच्या मंत्रिमंडळाने थकबाकी अदा करण्याबाबत ठामपणे निर्णय घेतलेला असतांना तेवढा भाग लपवून ठेवण्याचा व शासननिर्णयात समाविष्ट न करण्याचा अधिकार महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाला भारताच्या घटनेने दिलेला नाही."

**(८)** केंद्रसूचीतील विषयावर केंद्राने केलेल्या कायद्याच्या विरोधात जाणारा

## SCHEDULE IX (VIDE RULE 17 /1) :- TRUST REG. NO. F-1564

**NAME OF THE PUBLIC TRUST : NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION TRUST, NAGPUR**

Place : Nagpur * Taluka : Nagpur * : District Nagpur

**INCOME AND EXPENDITURE ACCOUNTS FOR THE YEAR ENDING ON 31st MARCH 2020**

| EXPENDITURE | Amount Rs. |
|---|---|
| **To Expenditure in respect of Properties** | |
| Rate, taxes, cesses … … … … | |
| Repairs and maintenance … … … | --- |
| Building Maintenance … … … … | --- |
| Insurance … … … … … … | --- |
| Depreciation … … … … … … | 68,184.01 |
| **Other expenses** (Sch 'F') | |
| To Establishment expenses | 2,46,677.50 |
| To Remuneration to trustees (in the case of a math) to the head of the math including his house hold expenditure, if any | --- |
| To Contribution and fees … … … … … | --- |
| To Printing and Stationery … … … … | 41,150.50 |
| **To amount Written of** | |
| (a) Bad debts … … … … … … | --- |
| (b) Loan Scholarships … … … … | --- |
| (c) Irrecoverable rents… … … … | --- |
| TDS Receivable/Income Tax Paid of Earlier years | 2,68,318.00 |
| (d) Other items… … … … … | --- |
| To Miscellaneous Expenses … … | --- |
| To Depreciation … … … | --- |
| To Amount transferred to Reserve or Specific Funds | |
| To Loss on Sale of Investment … … … … | --- |
| To Golden Jubliee Prog. Exp. Ac | --- |
| To Donation … … … … | --- |
| **To Expenditure on objects of the trust** | |
| (a) Religious … … … … … … … | |
| (b) Educational (NUTA Bulletin) … … 11,38,711.00 | |
| Bulletin Postages Exp. … | 11,38,711.00 |
| (c) Medical Relief … … … … … | |
| (d) Relief of Poverty … … … …. … | |
| (e) Other Charitable objects … … … | |
| Surplus Carried over to B/S … … … … | 11,04,614.99 |
| **TOTAL RS.** | 28,67,656.00 |

| INCOME | Amount Rs. |
|---|---|
| **By House Rent** … … … … … | |
| **By Agriculture Income** … … … … | |
| **By Hospital Receipt** … … … … … | |
| **By land Rent** Accrued/Realised … … … | |
| **By Interst** | |
| On MIDS … | 7,08,727.00 |
| On Fixed Deposit … … | 19,82,833.00 |
| On Bank account | 1,76,096.00 |
| On IT Refund | --- |
| **By Dividend** … … … | --- |
| **By Donation** in cash or Kind … … … | --- |
| **By Grants** … … … … … | |
| **By Income** from other sources … … | --- |
| **By Subscription & Membership** … … | |
| **By Profit** on sale of Investment … … … | |
| **By Transfers** from Reserve … … … | |
| Deficite carried over to Balance Sheet… … | --- |
| **TOTAL RS.** | **28,67,656.00** |

Trustee/
Sd/- P. M. Tayade
Trust Address :
Nagpur University Teachers Association Trust
Date : 29.10.2020

**As per Our report of even date**
For C.R.SAGDEO & CO
Chartered Accountants
FRN 108959W
sd/ **C.A. Sameer S. Wazalwar (Partner)**
Membership No. 139162

Place : Nagpur

कायदा राज्यशासनाला करता येत नाही. पूर्वीच असा काही कायदा केला असेल तर त्यातील केंद्रीय कायद्याच्या विरोधात असलेल्या तरतुदी विसंगतीच्या प्रमाणात रद्दबातल होतात अशी घटनात्मक व्यवस्था असतांना **"केंद्रशासनाने केंद्रसूचीतील विषयावर केलेल्या कायद्यातील जेवढ्या तरतुदींना उच्च शिक्षण विभागाच्या शासननिर्णयाने मान्यता दिली असेल तेवढ्याच तरतुदी अंमलात आणाव्यात," ही एक अंधश्रद्धा होय.** या अंधश्रद्धेचे नेतृत्व करण्याचे भाग्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरूंना लाभावे ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. असे प्रतिपादन करून महासंघाच्या या ठरावाच्या परिच्छेद ८.३ मध्ये याबाबतचे तपशील पुढील शब्दात नमूद करण्यात आलेले होते :-

"८.३ केंद्रसूचीतील किंवा समवर्ती सूचीतील एखाद्या विषयावर **"संसदेने/ केंद्र शासनाने पारित केलेला एखादा अधिनियम व त्या अधिनियमाने अधिकार दिल्यावरुन करण्यात आलेले उपविधान, विनियम किंवा नियम"** यांच्या विरोधात जाईल असा "कोणताही अधिनियम राज्यशासनाला करता येत नाही" पूर्वीच केला असेल तर त्यातील केंद्रीय तरतुदींशी विसंगत असणारा भाग (मग तो राज्याच्या अधिनियमात असेल, उपविधानात असेल किंवा परिनियमात, नियमात असेल) विसंगतीच्या प्रमाणात रद्द होईल" या घटनेतील तरतुदींकडे व त्या प्रकारच्या मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अनेक निर्णयांकडे दुर्लक्ष करून **"केंद्र शासनाने मान्य केलेल्या रेग्युलेशन्स मध्ये राज्यशासनाच्या उच्च शिक्षण विभागाला दुरुस्त्या करता येतात" अशी भूमिका घेणे म्हणजे निव्वळ अंधश्रद्धा पसरविणे होय. बुवाबाजी, चमत्कार, भाकडकथा, कपालेकल्पित स्थितीकथन, विज्ञाननिष्ठतेचा अभाव, कार्यकारण संबंध लक्षात घेण्याची बुद्धीची मर्यादित क्षमता यातून अंधश्रद्धा जन्माला येतात. पण स्पष्टपणे घटनेत असलेल्या तरतुदी व सर्वोच्च न्यायालयाचे एकमुखी निर्णय यांना खुंटीवर टांगून अंधश्रद्धांचे भरघोस पीक घेता येते, हे महाराष्ट्रातील विद्यापीठांनी जगाला दाखवून दिले आहे.** अंधश्रद्धा पसरविण्याच्या या कामाचे नेतृत्त्व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू करतात हे पाहून त्या संताचा आत्मा तळमळला तर त्यात नवल ते काय? अमरावती येथे अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुख्य कार्यालय उघडून त्याची एक एक शाखा इतर विद्यापीठाच्या कार्यालयात उघडावी लागेल अशी ही स्थिती आहे. **विद्यापीठ कारभाराविषयीच्या घटनात्मक व कायदेशीर स्थितीविषयीच्या संपूर्ण अज्ञानाचे हे जे जाहीर प्रदर्शन सर्व विद्यापीठांनी सामुहिकरित्या मांडले आहे ते महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण क्षेत्राला खचितच लाजेने मान खाली घालायला लावणारे आहे."**

**(९)** शेकडो शिक्षकांनी संघटनेच्या नेतृत्त्वाखाली मोर्चाने जाऊन त्या त्या विद्यापीठाच्या मा. कुलगुरूंना याबाबतची निवेदने दिली होती. या सर्व अपप्रकाराचे नेतृत्त्व अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू करीत असले तरी महाराष्ट्रातील कोणत्याही विद्यापीठाचे कुलगुरू या अपप्रकारात सहभागी होण्यामध्ये मागे नव्हते. अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या बाबतीत एक गोष्ट नमूद केली पाहिजे, ती म्हणजे संघटनेच्या निवेदनाला उत्तर देण्याचे सौजन्य तरी त्यांनी दाखविले होते. ते उत्तर समाधानकारक नव्हते हा भाग वेगळा पण इतर कोणत्याही विद्यापीठाच्या कुलगुरूंनी निवेदनाची पोच देण्याचे सौजन्य सुद्धा दाखविले नाही. या सर्व घटनाक्रमाचे तपशील महासंघाच्या ठरावाच्या परिच्छेद ८.४ व ८.५ मध्ये नमूद आहेत. ते पुढील शब्दात :-

## STATEMENT REGARDING THE FIXED SECURITIES OF THE ASSOCIATION AS ON 31ST MARCH, 2020.

**STATEMENT NO. 31**

### A) LIFE MEMBERS

**1**. No.Of Members as on the day of Constitution amendement (9th May, 1976 i.e. to put membership fee in fixed deposits.) ... ... 214

**2.** Total No. of Members as on the Date (9th Oct. 1988) of increasing the L.M.fees from Rs. 151 to 501) .... 2846

**3.** No. of Members from 9th May 1976 to 9th Oct. 1988 (2-1) = (2846-214) =... 2632

**4.** Total No. of Members as on the date (30th April 1991) of increasing the L.M. fees (from Rs. 501 to 2001) 3279

**5.** No. of Members from 9th Oct. 1988 to 30th April 1991 (4-2)=(3279-2846)= ... 433

**6.** Total No. of members as on the date (31st December 2000) of increasing the L.M.fees from (Rs. 2001 to 4001) ... 4723 **7.** No. of Members from 30 April, 1991 to 31st March, 2002 (6-4) = (4723-3279) = ...1444

**8.** Total No. of members as on the date (30 th September 2006) of increasing the L.M.fees from (Rs. 4001 to 10001) ... 5195

**9.** No. of Members from 1st January, 2001 to 31st March, 2008 (9-6) = (5195-4723) = ...472

**10.** Total No. of members as on 31st March 2020... 5800

**11.** No. of memebers from 1st October 2006 to 31st March 2020... (10-8) (5800 - 5195) = 605

### B) TEACHERS WHO MADE PART PAYMENT OF L.M.FEES

**12.** a) No.of Teachers who have paid 3001/3000...00
b) No.of Teachers who have paid 4001/4000...11
c) No.of Teachers who have paid 5001/5000...06
d) No.of Teachers who have paid 10000/10,001...00

### C) AMOUNT OF L.M. FEES RECEIVED....Rupees

**13.** Amount Received from Members mentioned at Sr.No.1 above Rs. ...... 00-00

**14.**Amount Received from members at Sr.No.3 above (2632 x 151) ... ... 3,97,432-00

**15.** Amount Received from members mentioned at Sr.No.5 above (433 x 501) ... ... 2,16,933-00

**16.** Amount Received from members mentioned at Sr. No.7 above. (1444 x 2001) ...... 28,89,444.00

**17.** Amount Received from members mentioned at Sr. No.9 above (472 x 4001) ... 18,88,472.00

**18.** Amount Received from members mentioned at Sr.No.11 above (605 x 10001) ... 60,50,605.00

**19.** Amount Received from members mentioned at Sr.No.12 above ... 74017.00

**20.** Total amount of L.M.Fund received from all the members mentioned at Sr.No. 14 +15+16+17+18+19 above. and hence expected to have been invested in fixed Securties ...... 1,15,16,903.00

### D) TOTAL AMOUNT IN FIXED SECURTIES.

**21.** Total amount invested in fixed securities(Details as per Appendix A & B ) (1,16,025 + 1,16,50,000 ) = 1,17,66,025.00

**22.**Total Balance in life membershipAc.(A/c.20127044843) .. 1,51,228.19

**23.** Total amount in fixed Securities and cash in the Bank (21+22)... ...1,19,17,253.19

**24.** Amount of cheques under Realisation since they are deposited recently ......

**25.** Total of 23 and 24 above...... 1,19,17,253.19

**26.** Surplus/deficit of 25 over 20 ... ... ...4,00,350.19

***APPENDIX* 'A'**

Statement regarding the Fixed Securities of the Association as on 31st March, 2020

(See Item at Serial No.21 in the statement).

UNITS OF UNIT TRUST OF INDIA

(1) Sr. No. (2) Folio Certificate No.:- 526218293593 (3) No. of Units :- 9409.976 (4) Face Value of Each Unit :- 12.33 (5) Amount of Investment :- 1,16,025 (6) Date of Investment :- 25.2.2008 (7) Period of Investment :- 6 Years (8) Rate of Dividend :- Total : 1,16,025

***APPENDIX* 'B'**

Statement regarding the Fixed Securities of the Association as on 31st March, 2020

(See Item at Serial No.21 in the statement).

BANK OF MAHARASHTRA,

MIDS SCHEMES

| Sr. No. | MIDS A/c No. | Amount of Investment | Date of Investment | Period of Investment | Rate of interest |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 60008546205 | 10,00,000 | 08.05.2019 | 1 Year | 6.50% |
| 2. | 60161647865 | 6,00,000 | 08.03.2020 | 444 Days | 6.00% |
| 3. | 60105101243 | 5,00,000 | 17.12.2019 | 1 Year | 6.00% |
| 4. | 60048786579 | 20,00,000 | 27.08.2019 | 1 Year | 6.00% |
| 5. | 60350953717 | 9,00,000 | 17.01.2020 | 1 Year | 6.00% |
| 6. | 60161639739 | 7,00,000 | 08.02.2020 | 3 Years | 5.75% |
| 7. | 60125202432 | 4,00,000 | 18.02.2020 | 1 Year | 6.00% |
| 8. | 60128210687 | 25,00,000 | 20.03.2020 | 1 Year | 6.00% |
| 9. | 60277928661 | 13,00,000 | 23.05.2020 | 1 Year | 6.00% |
| 10. | 60298128343 | 12,50,000 | 24.12.2019 | 1 Year | 6.00% |
| 11. | 60319626871 | 5,00,000 | 05.12.2019 | 1 Year | 6.00% |
| | **Total** | **1,16,50,000** | | | |

**Date : 29.10.2020** **Dr. P. M. Tayade**, Treasurer,

"८.४ या महासंघाने घेतलेल्या निर्णयानुसार घटक संघटनांच्या नेतृत्वाखाली शेकडो शिक्षकांनी १७ जून २०१९ रोजी प्रत्येक विद्यापीठाच्या मा.कुलगुरूंना एक तपशीलवार निवेदन देऊन ही घटनात्मक स्थिति त्यांच्या लक्षात आणून दिली. "विद्यापीठाचे कुलगुरू या नात्याने आपल्या अखत्यारीत असलेल्या राज्यशास्त्र विभाग, घटनाशास्त्र विभाग व विधी विभाग यातील तज्ज्ञांशी चर्चा करून आपण राज्यशासनाला यासंदर्भात अभ्यासपूर्ण सल्ला द्यावा व विद्यापीठावर आलेल्या या घटनात्मक संकट प्रसंगी निश्चित व उघड भूमिका घेऊन या विषयावर व विषयोक्त ठरावातील इतर बाबींवर आपले अभ्यासपूर्ण मत शासनास कळवावे" अशी विनंती या निवेदनातून करण्यात आली होती. त्यावर कुलगुरूंनी काय कारवाई केली? तर एका विद्यापीठाच्या मा.कुलगुरूंनी संघटनेला पत्र पाठवून पुढीलप्रमाणे कळविले :- "प्राप्त निवेदनातील बाबी ह्या शासनाशी निगडीत असल्यामुळे सदर निवेदन त्यांच्याकडे माहितीकरीता व आवश्यक त्या मार्गदर्शनाकरीता पाठविण्यात येत असून सदर निवेदनाच्या संदर्भात आवश्यक मार्गदर्शन प्राप्त झाल्यास संघटनेला तसे कळविण्यात येईल." **कुलगुरूंच्या कार्यालयापासून १०० फुटावर कार्यरत असलेल्या विधी विभागाच्या 'प्रोफेसर' दर्जाच्या विभाग प्रमुखाशी सल्लामसलत करणे कुलगुरूंना निरर्थक वाटावे व अशा घटनात्मक प्रश्नावर कुलगुरूंनी मंत्रालयातील 'बडेबाबुं'चे मार्गदर्शन मागावे यावरून आमच्या विद्यापीठांच्या प्रशासनाचा प्रवास कोणत्या भयसूचक मार्गावरून चालू आहे याचे पुरेसे दर्शन होते.**

८.५ विद्यापीठातील विधी विभागाच्या प्रमुखांशी चर्चा करणे अडचणीचे वाटत असेल **तर घटनात्मक स्थितीच्या या अ-ज्ञान पालनकर्त्यांनी भारतीय घटनेचे कलम २५४ एकदा निदान वाचून तरी पहावे अशी विनंती करण्याशिवाय आपण या क्षणी वेगळे काही करू शकत नाही याचे या कार्यकारी मंडळाला मनापासून दुःख वाटते.**"

### (ब) मा. सर्वोच्च न्यायालयाचा २८ ऑगस्ट २०२० रोजीचा निर्णय

**(१०)** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या ठरावाच्या परिच्छेद ८.५ मध्ये सर्व विद्यापीठांच्या मा. कुलगुरूंना त्यांनी भारतीय घटनेतील २५४ हे कलम तरी निदान वाचून पाहावे अशी कळकळीची विनंती करण्यात आली होती. त्यावर त्यांनी काय कारवाई केली, केली किंवा नाही हे काही महासंघाला कळू शकले नाही. मात्र आता सर्वोच्च न्यायालयाच्या तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने ***(यापुढे "मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय" असा उल्लेख)*** दिनांक २८ ऑगस्ट २०२० रोजी दिलेल्या निर्णयामध्ये कलम २५४ ची आठवण करून देण्यात आलेली आहे. केंद्रसूचीतील विषयांवर कायदे करण्याचा व प्रशासन करण्याचा अधिकार संपूर्णपणे केंद्रशासनाचा असेल. समवर्ती सूचीतील विषयांवर केंद्र व राज्यशासन या दोघांनाही कायदे करता येतील. पण त्याबाबतीत राज्यशासनाचे अधिकार मर्यादित राहतील व त्या मर्यादा त्यांच्यावर भारतीय घटनेच्या २५४ कलमान्वये घातलेल्या आहेत. "Co-ordination and determination of Standards" हा विषय घटना अंमलात आल्यापासून केंद्रसूचीमध्ये आहे, पण १९७७ पासून "**विद्यापीठ शिक्षण**" हा विषय समवर्ती सूचीमध्ये गेलेला असल्यामुळे केंद्रशासनाला या बाबतचे अधिनियम व प्रशासन करता येईल. राज्याचे अधिकार त्याबाबतीत मर्यादित राहतात, हे या निर्णयाच्या परिच्छेद ५० मध्ये नमूद करण्यात आलेले आहे. ते पुढील शब्दात :- "It is also necessary to remember that from 1977 education including, inter alia, medical and university education, is now in the Concurrent List so that the Union can legislate on admission criteria also. **If it does so, the State will not be able to legislate in this field,** except as provided in Article 254." *(See Para 50 of the Supreme Court Judgement dated 28.08.2020)*

**(११)** केंद्रसूचीतील विषयांचा कारभार हा पूर्णपणे केंद्रशासनाच्या अखत्यारीत असेल. "विद्यापीठ शिक्षण" हा विषय समवर्ती सूचीमध्ये असून त्याबाबत राज्यशासनाला भारतीय घटनेच्या खंड २५४ मधील तरतुदीच्या मर्यादेतच आपले अधिकार वापरावे लागतात, असे मा. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ५० मध्ये नमूद केले आहे. भारतीय घटनेतील खंड २५४ (१) शब्दशः पुढीलप्रमाणे:-

**"Inconsistency between laws made by Parliament and laws made by the Legislatures of States.**

**254. (1)** If any provision of a law made by the Legislature of a State is repugnant to any provision of a law made by Parliament which Parliament is competent to enact, or to any provision of an existing law with respect to one of the matters enumerated in the Concurrent List, then, subject to the provisions of clause (2), the law made by Parliament, whether passed before or after the law made by the Legislature of such State, or, as the case may be, the existing law, shall prevail and the law made by the Legislature of the State shall, to the extent of the repugnancy, be void."

**(१२)** सन २०१८ चे रेग्युलेशन हा पूर्णपणे केंद्रसूचीतील विषय आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामध्ये केंद्रसूचीतील विषयांबाबत स्पष्टता करतांना विद्यापीठ अनुदान आयोगाची निर्मितीच मुळात कोणत्या प्रयोजनासाठी करण्यात आलेली आहे याचा स्पष्ट उल्लेख मा. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ४६ मध्ये पुढील शब्दात केलेला आहे :-"The Parliament enacted the University Grants Commission Act, 1956 to make provision for the **coordination and determination of standards** in Universities and for that purpose to establish a University Grants Commission." *(See Para 46 of the Supreme Court Judgement dated 28.08.2020)* विद्यापीठ अनुदान आयोग कायद्याच्या कलम २६ (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून विद्यापीठ अनुदान आयोगाने २००३ चे रेग्युलेशन्स तयार केले असल्याचा स्पष्ट उल्लेख या निर्णयाच्या परिच्छेद ६६ मध्ये आहे. तो पुढील शब्दात :- "The University Grants Commission, in exercise of power under Section 26 sub-section (1) of the Act, 1956 have made the Regulations namely, **"the UGC (Minimum Standards of Instruction for the Grant of the Master's Degree through Formal Education) Regulations, 2003"** *(See Para 66 of the Supreme Court Judgement dated 28.08.2020)* विद्यापीठ अनुदान आयोगाने हे जे रेग्युलेशन्स तयार केलेले आहे त्या रेग्युलेशन्समधील रेग्युलेशन ६.१ पुढील प्रमाणे असल्याची नोंद मा. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ६६ मध्ये पुढील शब्दात केलेली आहे:- **"Regulation 6, which deals with "examination and evaluation" contains following regulation as Regulation 6.1:-**

"6.1 The **university shall adopt the guidelines** issued by the UGC and other statutory bodies concerned from time to time in respect of conduct of examinations." *(See Para 66 of the Supreme Court Judgement dated 28.08.2020)*

**(१३)** जी गोष्ट २००३ च्या रेग्युलेशनला लागू आहे, तीच गोष्ट २०१८ च्या रेग्युलेशनला लागू आहे. म्हणजे असे की, एकदा विद्यापीठ अनुदान आयोगाने रेग्युलेशन्स निर्गमित केल्यानंतर त्या रेग्युलेशन्सच्या अंतर्गत गाईडलाईन्स प्रसृत केल्या असतील तर राज्यशासनाचा उच्च शिक्षण विभाग किंवा विद्यापीठे यांना अत्यंत मर्यादित अधिकार उरतात. केंद्रस्थानी असलेल्या शीर्षस्थ संस्थेने ठरवून दिलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या विरोधात जाईल अशी कोणतीही गोष्ट राज्यशासनाच्या उच्च शिक्षण विभागाला किंवा विद्यापीठांना करता येणार नाही, असे या निर्णयाच्या परिच्छेद ५३ मध्ये स्पष्ट शब्दात नमूद केलेले आहे. ते पुढीलप्रमाणे :- "The concerned Department of the State and the affiliating University have a role to play but it is limited in its application. They cannot lay down any guideline or policy which would be in conflict with the Central statute or the standards laid down by the Central body." *(See Para 53 of the Supreme Court Judgement dated 28.08.2020)*

**(१४)** उच्च शिक्षण संस्थांचा दर्जा निर्धारण करणे व त्यांच्यामध्ये समन्वय राखण्याचा अधिकार हा एक तज्ज्ञांचे मंडळ म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाला देण्यात आलेला आहे असा निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाने दिल्याचे या निर्णयाच्या परिच्छेद ५४ मध्ये नमूद केलेले आहे. ते पुढील शब्दात :- "The judgment of the Bombay High Court was in appeal before this Court where

Agenda of the General Body meeting is printed in this NUTA Bulletin. If you propose to suggest any amendments to any of the proposals/Resolutions included in the Agenda, you may send it to me within a period of one week from the date of the posting of this Bulletin.

It will not be possible for the amendments received after the due date to be included in the additional agenda. Please send one copy of your amendment to Prof. P.B. Raghuwanshi, President NUTA, Buty Plot, Near Mahajan wadi, Rajapeth, Amravati 444 601 - **Dr.Vilas Dhone, Secretary, NUTA**

this Court categorically laid down that UGC being an expert body is **entrusted with duty to take such steps as it may think fit for the determination and maintenance of standards** of teaching, examination and research in the University." *(See Para 54 of the Supreme Court Judgement dated 28.08.2020)*

(१५) सन २००३ च्या रेग्युलेशनसमध्ये **"University shall adopt the guidelines issued by the University Grants Commission"** असा स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला असून त्यामुळे या गाईडलाईन्सचे पालन करणे हे विद्यापीठांचे विधीमय कर्तव्य असून ते त्यांच्या वरील विधीमय बंधनसुद्धा आहे, असे मा. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ६७ मध्ये नमूद केले आहे. ते पुढील शब्दात :- **"The statutory Regulation, 2003 thus,** categorically requires Universities to adopt the Guidelines issued by the UGC, hence, it is the statutory duty of the Universities to adopt the guidelines issued by the UGC. It is the statutory obligation of the Universities" *(See Para 67 of the Supreme Court Judgement dated 28.08.2020)* पुन्हा नमूद करायचे म्हणजे २००३ च्या रेग्युलेशनला जे लागू आहे ते २०१८ रेग्युलेशला लागू राहील.

### *(क) विद्यापीठांनी करावयाची कार्यवाही*

(१६) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २८ ऑगस्ट २०२० रोजीच्या निर्णयाने केंद्रसूचीतील विषयावर भारतीय संसदेने कायदा करून स्थापित केलेले विद्यापीठ अनुदान आयोग, त्यासाठी करण्यात आलेला १९५६ चा विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, त्या अधिनियमाने आयोगाला प्रदान केलेले रेग्युलेशन्स करण्याबाबतचे अधिकार व त्या रेग्युलेशन्सची बंधनकारकता, त्या संदर्भात विद्यापीठांची व उच्च शिक्षण विभागाची भूमिका या बाबी पुन्हा एकदा निश्चितपणे व काटेकोरपणे ठरवून दिलेल्या आहेत. **मा. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचा विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी तसेच उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी काळजीपूर्वक अभ्यास करून उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये घडत असलेल्या घटनाबाह्य वागणूकीला ठामपणे प्रतिबंधीत केले पाहिजे.**

(१७) "विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन्स हे जेवढ्या प्रमाणात उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासननिर्णयाने मान्य केले असतील तेवढ्याच प्रमाणात त्याची अंमलबजावणी करण्यात यावी" अशाप्रकारचे निदेश महाराष्ट्रातील जवळ जवळ सर्वच विद्यापीठांच्या मा. कुलगुरूंनी काढल्यामुळे अगोदरच या विद्यापीठांनी त्याबाबतीत घटनाबाह्य व बेकायदेशीर वर्तन केलेले आहे. **मा. सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल लक्षात घेता विद्यापीठांनी ताबडतोब दुरूस्तीची कार्यवाही हाती घेणे आवश्यक आहे. तशी विनंती सर्व विद्यापीठांच्या मा.कुलगुरूंना करण्यात येत आहे.**

**(A)** सर्वच विद्यापीठांच्या मा. कुलगुरूंनी रेग्युलेशन्सच्या अंमलबजावणीबाबत जे निदेश यापूर्वी निर्गमित केलेले आहे त्यामध्ये दुरूस्ती होणे आवश्यक आहे किंवा निर्गमित केलेले निदेश रद्द करून सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या अधिकार क्षेत्राच्या मर्यादा लक्षात घेऊन मा. कुलगुरूंनी नव्याने निदेश निर्गमित करणे आवश्यक आहे.

**(B)** सर्वोच्च न्यायालयाने आखून दिलेल्या अधिकार मर्यादा लक्षात घेऊन विद्यापीठाच्या सक्षम प्राधिकरणांनी याबाबतच्या परिनियमांचे प्रारूप तातडीने तयार करून व संमत करून त्याबाबत यथोचित कारवाई करणे आवश्यक आहे.

**(C)** विद्यापीठांच्या विविध प्राधिकरणांनी सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयावर

# *अमरावती विभाग शिक्षक मतदार संघातील निवडणूक सन २०२०*
# *नुटाच्या कार्यकारी मंडळाचा निर्णय*

**१.** संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमातर्फे (यू.एन.डी.पी.) पहिला मानव विकास अहवाल १९९० मध्ये प्रसिद्ध करण्यात आला. या अहवालांमुळे मानवी विकासाचा प्रश्न ऐरणीवर आला. मानव विकास म्हणजे काय? शिक्षण, आरोग्य आणि उपजीविकेचे साधन या जीवनाच्या तीन महत्त्वाच्या पैलूंसाठी दिलेला लढा आणि त्यांची प्रत्यक्षात झालेली पूर्तता, यांचा मिलाफ म्हणजेच मानव विकास. अशी मानवी विकासाची व्याख्या या अहवालाने निश्चित केली. जीवनातील या तीन महत्त्वाच्या घटकांसाठी सुरू असलेला संघर्ष हा एक दैनंदिन अनुभव असतो. एक व्यक्ती म्हणून हा लढा चालू असतोच; शिवाय समाज, संघटना आणि राष्ट्राच्या पातळीवरही तो सुरू असतो. शिक्षण, आरोग्यसेवा, जीवनमान, पोषाहार तसेच मिळकत यांची गोळाबेरीज म्हणजेच विकास प्रक्रिया.

**२.** आतंरराष्ट्रीय पातळीवर शिर्षस्थस्थानी काम करणाऱ्या संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमांच्या (UNDP) या पहिल्या अहवालामध्ये शिक्षणाचे हे जे महत्त्व नमूद केलेले आहे. त्याच्या कितीतरी वर्षे अगोदर आमच्या घटनाकारांनी या बाबीची यथोचित नोंद घेतली होती, हे शिक्षण क्षेत्राचे भाग्य होय. भारतीय घटनेने विधानपरिषदेमध्ये शिक्षकांना स्वतंत्रपणे प्रतिनिधीत्व बहाल केलेले आहे. शिक्षक हा एकमेव व्यवसाय असा आहे की, ज्यांना स्वतंत्रपणे विधानपरिषदेत घटनेने जागा राखून ठेवलेल्या आहेत. याचे मर्म समजून घेऊनच या प्रतिनिधीत्वाकडे पाहिले पाहिजे. सर्व थरातील लोकांना शिक्षण उपलब्ध झाले पाहिजे, यासाठी तळमळीने काम करणाऱ्या समाजसुधारकांची एक मोठी परंपरा महाराष्ट्राला लाभलेली आहे. या परंपरेतील काही थोर समाजसुधारक घटनानिर्मितीच्या कामाचे नेतृत्त्व करीत होते, त्या कामामध्ये हिरीरीने सहभागी होते. याचे विस्मरण होता कामा नये. शिक्षक मतदार संघ हे मुख्यत्वे शिक्षण क्षेत्राच्या तसेच शिक्षकांच्या समस्या मांडण्यासाठी वापरले जावे असे अपेक्षित आहे.

**४.** अमरावती विभाग शिक्षक मतदार संघातून विधानपरिषदेवर शिक्षकांनी निवडून दिलेला एक प्रतिनिधी पाठविण्यासाठी दिनांक १ डिसेंबर २०२० रोजी निवडणूक होत आहे. शिक्षण व शिक्षक या व्यवसायासमोर उभे ठाकलेले प्रश्न सोडविण्यात मजबूत संघटनात्मक बांधणीचा भरभक्कम आधार असलेले प्रतिनिधी सभागृहात या कामाला जास्त चांगला न्याय देऊ शकतात, असा आमच्या संघटनेचा अनुभव आहे. या अनुभवाच्या आधारावरच या निवडणुकीमध्ये संघटनेची भूमिका स्पष्ट करण्यासंदर्भात पुढील निर्णय घेण्यात आलेले आहेत.:-

**(i)** महाराष्ट्र राज्यस्तरावरील महासंघाची घटक संघटना असलेल्या विज्युक्टाचे अधिकृत उमेदवार **प्रा.डॉ.अविनाश बोर्डे यांना पसंतीचा प्रथम क्रमांक देण्यात यावा, असा निर्णय घेण्यात आला आहे.**

हा निर्णय घेत असतांना अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र या विषयावरील एम.ए. बरोबरच एम.कॉम., एम.एड., एम.फील., पीएच.डी. इत्यादी उच्च शैक्षणिक पदव्या डॉ. अविनाश बोर्डे यांनी प्राप्त केलेल्या आहेत. याबरोबरच गेल्या १० वर्षांपासून ते विद्यापीठाच्या सिनेटचे एक जागरूक सदस्य म्हणून कार्यरत आहेत. महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाचे ते उपाध्यक्ष आहेत, तसेच सन २०१२ पासून तर आजपर्यंत ते सातत्याने विज्युक्टाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. या बाबीसुद्धा विचारात घेण्यात आल्या आहेत.

**(ii)** या निवडणुकीत आपले इतर काही सहकारी उभे आहेत. हे लक्षात घेता व भारतीय घटनेतील कलम १७१ (४) मधील तरतुदीनुसार प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या एकल संक्राम्य मतदान पद्धतीनुसार ही निवडणूक होते, हे लक्षात घेऊन **किमान दुसरा, तिसरा व पसंतीचा चौथा क्रमांकसुद्धा आपल्या पसंतीनुसार अवश्य द्यावा, असाही निर्णय घेण्यात आला आहे.**

**(iii)** पसंतीक्रम हे १, २, ३, ४ अशा पद्धतीने अंकात नोंदवावयाचे आहेत. अक्षरात नव्हे. अक्षरात नोंदविल्यास मतपत्रिका अवैध होते.

**५.** याच तारखेला नागपूर विभाग पदवीधर मतदार संघातून सुद्धा निवडणूक होत आहे. उपलब्ध उमेदवारामधून शिक्षक व शिक्षण हितास्तव झटू शकेल अशा उमेदवाराला आपल्या पसंतीनुसार पसंतीक्रमांकाचे मतदान करावे.

***डॉ. प्रवीण रघुवंशी*** — ***डॉ. विलास ढोणे***

*अध्यक्ष, नुटा* — ***०३.११.२०२०*** — *सचिव, नुटा*

आधारित घटनात्मक तरतुदींचे ठामपणे पालन करण्याचा निर्धार व्यक्त करणारे धोरणात्मक ठराव मंजूर करण्याची आवश्यकता आहे.

**(१८)** घटना, कायदे, नियम, कायद्याचे राज्य या संकल्पनांशी बांधिलकी असलेल्या विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणाच्या सदस्यांनी याबाबत तातडीने कारवाई करावी अशी विनंती करण्यात येत आहे.

### *(ड) शासनाने करावयाची कार्यवाही*

**(१९)** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने घटनात्मक तरतुदींचे जे विश्लेषण केलेले आहे व अगोदरच अस्तित्वात असलेली पूर्वस्थिती ठामपणे विदित केलेली आहे, ती लक्षात घेऊन दिनांक ८ मार्च २०१९ रोजीचा उच्च शिक्षण विभागाचा शासननिर्णय व त्याच विभागाने निर्गमित केलेला दिनांक १० मे २०१९ रोजीच्या शासननिर्णयात यथोचित सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. **तसेच शासननिर्णयाच्या माध्यमातून विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या रेग्युलेशनचा भंग करण्याचा शासनाचा कोणताही हेतू नाही, हे स्पष्ट होण्याची आवश्यकता आहे.**

## *विषय क्रमाक ७९२ :*
## *फसवणूक करणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करणे व थकबाकी अदा करणे*

**कार्यकारी मंडळाच्या बैठकीत संमत करण्यात आलेला पुढील प्रस्ताव कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा. सतेश्वर मोरे हे मांडतील. :-**

**(१)** दिनांक २ नोव्हेंबर २०१७ व ८ नोव्हेंबर २०१७ रोजीच्या केंद्रशासनाच्या अधिसूचना व दिनांक १८ जुलै २०१८ रोजीचे विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन्स या तीन दस्तऐवजांनी विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सातव्या वेतन आयोगाशी समकक्ष वेतनश्रेण्या लागू करणारी **एक समग्र योजना** देशभर लागू करण्यात आलेली आहे. सर्व अटीशर्तीसह ही एकूण योजना **(Entire Scheme)** एक समग्र योजना **(Composite Scheme)** म्हणून राज्याने अंमलात आणल्यास येणाऱ्या जादा अर्थभारापैकी निम्मा भार केंद्रशासन उचलेल असेही या योजनेत नमूद आहे.

**(२)** केंद्राच्या मानव संसाधन विभागाची दिनांक २६ सप्टेंबर २०१९ ची अधिसूचना अवलोकन केली असता असे आढळून येते की, एका बाजूला समग्र योजनेतील अटीशर्तींची मोडतोड करून व दुसऱ्या बाजूला प्रत्यक्षात न केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती मिळवून **उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी भारताच्या मा.राष्ट्रपतींची व केंद्रीय मंत्रिमंडळाची घोर फसवणूक करण्याचे अपकृत्य केलेले आहे.** अशाप्रकारे मा.राष्ट्रपतींची व केंद्रीय मंत्रिमंडळाची फसवणूक करण्यात अपराधी असलेल्या अधिकाऱ्यांवर कोणीही कारवाई करीत नाही, किंवा करू शकत नाही. या बाबीची साधी चौकशी केली जात नाही. जबाबदारी सुद्धा निश्चित होत नाही, ही गोष्ट अत्यंत अयोग्य आहे व उच्च शिक्षण विभागात सुरू असलेल्या अराजकतेला चालना देणारी आहे. **मा.राष्ट्रपतींची व केंद्रीय मंत्रिमंडळाची फसवणूक करून हे अधिकारी गप्प बसले नाहीत, तर ते करण्यापूर्वी त्यांनी राज्य मंत्रिमंडळाची सुद्धा फसवणूक केलेली आहे, असे नमूद करणारे स्पष्ट पुरावे उपलब्ध आहेत.**

**(३) नुसती उच्च शिक्षण विभागाच्या सचिवांची बदली करून हा विषय हातावेगळा करता येण्यासारखा नाही.** अशा फसवणुकीच्या प्रकरणामध्ये कोणकोणते अधिकारी गुंतलेले आहेत **याची चौकशी करण्यात येऊन जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.**

**(४)** सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याचा राज्यमंत्रिमंडळाने निर्णय घेतल्यानंतर (i) शासकीय कर्मचाऱ्यांची थकबाकी अदा करण्याबाबत (ii) सेवानिवृत्तांची थकबाकी अदा करण्याबाबत (iii) विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवानिवृत्त शिक्षकांच्या थकबाकीबाबत राज्य मंत्रिमंडळाने निर्णय घेतले व त्याबरहुकूम शासननिर्णय निर्गमित करण्यात आले. या सर्व वर्गांसाठी जो खर्च होणार, त्यावर एक रुपयाचे अर्थसहाय्य केंद्रशासनाकडून मिळत नाही. ज्या वर्गाच्या बाबतीत जवळ जवळ ५० टक्के म्हणजे तेराशे ते चौदाशे कोटी रुपयांचे अर्थसहाय्य केंद्राकडून मिळू शकते, (आता ते प्रत्यक्ष मिळालेले आहे.) त्या विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्याबाबतीत राज्याच्या **मंत्रिमंडळाने दिनांक ५ मार्च २०१९ रोजी बैठक क्रमांक २१५ मध्ये या विषयावर थकबाकी अदा करण्याचा आराखडा निश्चित रक्कमेसह मंजूर करणारा निर्णय घेतला व तो त्याच दिवशी जाहीर केला. मात्र अधिकाऱ्यांनी शासननिर्णय काढतांना तेवढा भाग वगळून टाकला.**

**(५)** जवळ जवळ १३२० कोटी ९३ लक्ष रुपयांचा निधी महाराष्ट्र शासनाच्या सुपूर्त करण्यास भारताच्या मा. राष्ट्रपतींनी मान्यता दिली. त्याप्रमाणे तो निधी महाराष्ट्र शासनाच्या सुपूर्त करण्यात आला. केंद्रशासनाच्या पत्रात नमूद असलेल्या अटी व शर्तीनुसारच वापर केला जाईल या अटीवर हा निधी मंजूर करण्यात आला आहे, असेही या अधिसूचनेत स्पष्टपणे नमूद आहे. **अतएव ही संपूर्ण थकबाकी तातडीने अदा करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.**

### TREASURER'S EXPLANATORY NOTE
GIVING DETAILS OF EXPENDITURE ON ESTABLISHMENT EXPENSES FOR THE YEAR ENDED ON 31ST MARCH 2020

In the Income and Expenditure Account of the Audit Report for the year ended on 31st March 2020 an amount of Rs. 2,46,677.50 is shown as expenditure towards establishment expenses. The General Body meeting of NUTA dated 15.4.79 while discussing the audit report for the year ending on 31st March 1978 had resolved (vide item no.(3) (c) on page no. 109 of 1979 NUTA Bulletin,) that "the treasurer will circulate a brief explanatory note regarding income and expenditure giving details of expenditure as far as possible along with financial statements hereinafter". Hence the details of the break up of establishment expenses are given here.

**ESTABLISHMENT EXPENSES FOR THE YEAR ENDED ON 31ST MARCH 2020**

| Particulars | Amount Rs.P. |
|---|---|
| Travelling Expenses | 16,705.00 |
| Telephone & Trunk Call | 14,143.00 |
| Meeting Expenses | 10,437.00 |
| Bank Charges | 2,832.20 |
| Postage | 2,598.50 |
| Miscellenous Expenses | 11,401.00 |
| Income Tax Return Fees | 2,124.00 |
| Clerks/Peon's Salary | 1,04,000.00 |
| Audit Fees | 16,520.00 |
| Legal Fees | 45,917.00 |
| Affiliation Fees | 20,000.00 |
| Total | **2,46,677.50** |

Date: 29.10.2020

Sd/- P. M. Tayade
Treasurer

## ITEM NO. 793 :
## *APPROVAL TO THE AUDITED STATEMENTS :*

**TO CONSIDER** and **TO APPROVE** the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account of the Association for the year ended on 31st March, 2020.

***Notes** : **(i)** The copy of the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account of the Association for the said Financial year is circulated on page 162& 163 of 2020 NUTA Bulletin. **(ii)** The Audited Balance Sheet and Income and Expenditure Account will be placed before the General Body by Dr. Prakash Tayade, Treasurer, on behalf of the Executive Committee. **(iii)** If any honourable member has a querry, regarding the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account, he should make it, within a week from the date of posting of this Bulletin, to Dr. Prakash Tayade Treasurer, NUTA, 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony , Near V.M.V. Campus, Amravati 444 604 specifying the exact point on which he seeks information/ clarification. A copy of the querry also be sent to Prof. P.B. Raghuwanshi, President NUTA, Buty Plot, Near Mahajan wadi, Rajapeth, Amravati 444 601 .*

## ITEM NO. 794 :
## *STATEMENT ON FIXED SECURITIES POSITION :*

**To Note** the Statement no. 31 showing the position of the Fixed Securities of the Association as on 31st March, 2020.

***Note : (i)** Statement no. 31 regarding the fixed securities of the Association as on 31st March, 2020 is circulated on page 164 of 2020 NUTA Bulletin. **(ii)** The Statement showing the position of the Fixed Securities of the Association as on 31st March, 2020, will be placed before the General Body by Dr. Prakash Tayade, Treasurer, on behalf of the Executive Committee.*

*****

# SECRETARY'S REPORT ON THE WORKING OF THE ASSOCIATION FOR THE YEAR ENDING ON 31st DECEMBER, 2019

*Prepared by the Executive Committee of NUTA under article (VI)(b)(ii) of the Constitution of NUTA and presented by Secretary on behalf of the NUTA Executive Committee*

Dear Friends,

1. It gives me immense pleasure to extend warm welcome to you on behalf of the Executive Committee of NUTA and on my personal behalf. It is indeed a proud privilege to place before this august body a brief account of the activities and achievements during the year 2019.

2. Right from its inception, NUTA has been committed to the welfare of teachers and their professional betterment. In keeping with the commitment, the association took up several issues concerning teaching community during the period of this report which witnessed significant developments and had major achievements.

3. The year 2019 witnessed the issuing of Government of Maharashtra GR No.Misc-2018/C.R.56/18/UNI -1 dated 8 March, 2019 regarding the implementation of scheme of pay scales of university and college teachers thereby accepting the scheme of government of India and referring to UGC regulations 2018, but erroneously the said Government Resolution and its further amendment dated 10-05-2019 is contrary to the scheme of Government of India and UGC Regulations, 2018 which is a matter of great concern causing injustice to the teachers and other employees.

4. On the other hand, the entire scheme of revision of pay scales, together with all the conditions to be laid down by the UGC by way of regulations and other guidelines should have been implemented by the State Governments and Universities and colleges coming under their jurisdiction as a composite scheme without any modification; except in regard to the date of implementation and pay scales. The Maharashtra Government instead of extending the scheme went on to make several modifications in the scheme that are contradictory to the original scheme.

**ISSUE OF NET-SET AFFECTED EACHERS:**

5. Non NET/SET teachers who were appointed between1992 and 2000 and who have been exempted by the UGC are now in Supreme Court. All SLP's are pending in Supreme Court and have not been listed yet for hearing .In view of the prolonged SLP in the Supreme Court, MFUCTO decided to move an Interim Application in the Supreme Court of India so that affected teachers can also get their long pending placement benefits as have been received by earlier petitioners on the basis of the Interim Order issued by the Hon'ble Supreme Court in the original petition which is still in force. Subsequently, notices have been issued in the month of November, 2019 by the Registrar of the Supreme Court to all affiliated units of MFUCTO to comply with the instructions therein with in a period of four weeks. The said period is over now and the Interim Application can be taken for hearing at any time now. NUTA in all its earnest is set to fight the case with all its might leaving no stone unturned. District wise meetings were organised to apprise the Teachers regarding the developments of NET/SET issue at the Supreme Court level.

**MFUCTO's case regarding non payment of 71 days salary:**

6. After pronouncing the verdict on 23th January, 2019 regarding 71 days salary to be issued to the teachers in WP 1913 of 2013 and WP 2290 /2015 at the high court of judicature at Bombay by the coram of two judges Shri. S. C. Dharmadhikari and Shri. S. Karnik, The Hon'ble Court in verdict gave orders to expediously release the salary of 71 days before March 30th, 2019 failing which it shall carry interest @ 8% from the due date till the same was disbursed. The Government of Maharashtra decided to go for Review Petition. The decision regarding Review Petition came to be pronounced on 8th November, 2019 wherein the Review petition was dismissed as there were no merits in the petition and the Hon'ble court went on to pass strictures on the govt. asking as to why the govt. was so hostile to teachers. Now the Government of Maharashtra has decided to go for SLP Diary No. 1779/2020 dated 14th January, 2020. The SLP at present is under Defect List for 90 days. The organization shall fight the case in all earnest and see that the teachers get their legal right and the salary that has been withheld over years. I am very happy to inform you that the SLP filed by the State Government is dismissed by the Hon'ble Supreme Court on 02.03.2020.

**Draft National Education Policy 2019**

7. In the backdrop of serious disturbing trends and scenario in the field of education the Govt. of India released a draft on New Education Policy on 1st June, 2019 which is to be implemented in 2020.

8. When studied in depth, it reflects a mismatch between diagnosis and prescription, a contradiction between drama and reality, hidden agenda of ideological domination of ruling class and strengthening of neo-liberal forces. The draft policy has ignored the common school system, paid deaf ear to the norms of social justice, opened the roads for more exclusion and negated fundamental pillars of the education. It has strengthened the forces of centralization, commercialization, corporatization and communalization of education. A central regular authority under the chairmanship of Prime Minister is empowered to decide all the matter concerning higher education negates the spirit of federal structure. It is for the first time, private institution has been given equal status with that of public institution. Attack on public funded education system, grading of institutions, much emphasis given to autonomous colleges and entry of foreign universities are bound to have impact on social justice.

9. Though the policy draft speaks of the crucial role of teachers, in reality nothing elaborate has been mentioned about him. His security, salary structure, service conditions, mode of appointment, large number of contractual and part time teachers, all appears to have been ignored.

10. The organization is committed to a democratic, secular, scientific and inclusive education policy and therefore draft national policy needs a greater scrutiny than it has received so far and hasty implementation of it would lead to injustice.

**AIFUCTO ACTIVITIES**

11. AIFUCTO members not only extended support to the National Trade Union strike on 8th and 9th January, 2019, but also participated to make it a success.

(a) AIFUCTO extended support to the agitation led by DUTA to absorb 4500 ad-hoc teachers.

(b) A historic march was taken out on Parliament on 19-02-2019 with a slogan 'Save Campus, Save Education, Save Nation' and 22 points charter of demands were presented to the Prime Minister of India.

(c) National Executive Meeting (NEC) of AIFUCTO was held on 6-7 April 2019 at Udaipur to condemn in the meeting the dictum of NITI AYOG and stressed need to strengthen public funded education system.

(d) On 21st October, 2019, AIFUCTO delegation met the chairman of UGC and submitted a memorandum highlighting the sanction of M.Phil, Ph.D. increments, implementation of UGC regulation, 2018 and demanded extension of date for the completion of Refresher Course under CAS Scheme.

(e) NEC meeting was held on 20th October, 2019 at Chandigarh to discuss new draft on Education Policy 2019 on 11th November, 2019. AIFUCTO delegation met UGC Chairman and placed old demands relating to UGC regulation and refresher course issues.

**MFUCTO Activities**

12. MFUCTO in its meeting held on 21st April, 2019, adopted a resolution to go for step-wise agitation as the State of Maharashtra had not adopted UGC regulations, 2018 as a composite scheme, but with several modifications. The teaching community was shocked to see the gross violation of UGC Regulation, 2018 (Gazette Notification) in the Govt. Resolution dated 8th March 2019 and 10th May 2019.

13. The State Government has not only modified the composite scheme of MHRD and UGC Regulations, but has grossly destroyed many provisions which invoked the teachers anger; as a result MFUCTO mobilized large number of teachers for the major actions.

(a) District wise meetings were held all over Maharashtra between 09/06/2019 and 15/06/2019 to make teachers aware about the hostility of bureaucrats towards teachers.

(b) On 17th June, 2019 all affiliated units of MFUCTO held demonstrations in their respective units and submitted MFUCTO resolution to the Vice Chancellors.

(c) On 24th June, 2019 centralized demonstrations were held at the office of Director, Higher Education, Pune from 12 noon to 4pm.

(d) On 01st July, 2019, Teachers from all over the state participated in a Dharna at Azad Maidan, Mumbai from 12 noon to 4pm.

(e) On 22nd July, 2019 teachers from all over the state participated in Dharna at Delhi and submitted a memorandum to the offices of Hon'ble Minister, HRD and the Chairman, UGC New Delhi.

(f) On 30th July 2019, MFUCTO delegation met the Chairman, UGC and his attention was drawn to the directions issued by the Vice Chancellors in different universities of Maharashtra and expressed a concern over the chaos that would create in coordination and mentainance of standards in Higher Education and requested him to issue fresh directions so that the state of Maharashtra would implement the scheme along with UGC regulations in its letter and spirit. But even after a month's patient awaiting no further communication came to be received from UGC and hence MFUCTO was forced to take following action.

(g) On 15-11-2019, Dr. P. B. Raghuwanshi, President NUTA served a legal notice to the Principal Secretary, Higher and Technical Education (P225NB2019) stating the need to correct the errors by withdrawing GR dated 08-03-2019 and corrigendum issued by Govt. of Maharashtra dated 10-05-2019 and urged him to issue a new policy in consonance with the scheme of Govt. of India guidelines and the regulations issued by UGC in 2018.

MFUCTO has now decided to intensify the struggle and take legal steps challenging the GR and Corrigendum.

**Election to the District Bodies of NUTA**

14. The election to the District bodies of NUTA took place between 30.12.2018 and 03-02-2019. On behalf of Executive Committee I thank all the working Chairman for smoothly transacting the business of the house and congratulate the office bearers for being inducted in different capacities and wish that the organization will get strong and march ahead under their able leadership.

**Participation in Action Programmes**

15. I am happy to inform this august body that the teachers from Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University, Sant Gadge Baba Amravati University and Gondwana University, Gadchiroli participated in large numbers in all the programmes of agitation launched by NUTA, MFUCTO and, AIFUCTO and made them successful. Nevertheless, the struggle has not ended. The association is keeping a vigilant eye on the developments of all the levels, leaving nothing to chance. I have absolutely no doubt that the days to come will witness more achievements since our demands are lawful and are based on strong legal footing.

**Tasks ahead**

16. Friends, it is true that some of our demands are nearing fulfillment because of the struggle of the NUTA under the able leadership of MFUCTO and AIFUCTO. However, some of the old issues are yet to be resolved. NUTA has always been committed to taking up problems of every section of the teaching community irrespective of their number and strength in the organization. NUTA has therefore several tasks ahead viz.

a. Faithful implementation of 7th Pay revision 'Package Scheme' in the state of Maharashtra.

b. To fight for filling up all the vacancies of Teaching and Non-teaching posts on regular basis.

c. To strengthen the battle for scrapping new pension scheme and extending assured pension scheme to all the employees including teachers by joining hands with other organizations.

d. A well regulated salary scheme to be framed for disbursement of salary to employees in professional institutes as per the Supreme Court judgment dated January 5th, 2017.

e. To take initiatives to protect the democratic functioning of the universities and to fight for issuing ordinance so as to reduce nominations on authorities in order to protect the autonomy of the University in state.

f. Stopping arbitrary functioning at the offices of the Joint Director and Director of Higher Education.

g. Compelling the Government to withdraw orders on contractual appointments and till such withdrawal to pay them the salary on par with their counterparts in Government colleges.

h. To organize and fight against anti-teacher attitude of the Government.

i. Enactment of suitable legislation for providing penalties for non-compliance of the University Grievance Committee Recommendations.

j. Ensure that all the benefits which teachers are given under the central orders are extended to Librarians and Directors of Physical Education.

k. To build pressure on Maharashtra Government to reconstitute Grievance Cell as per the High Court order dated May 10th, 2013 with retired judge as the Head of the Cell.

l. To strengthen the legal battle in Supreme Court in respect of NET-SET teachers and non-payment of 71 days salary case and to take all the ongoing cases in the Courts to their logical end.

m. The post of Professor and Associate Professor be given to incumbents with sufficient service without insisting on additional qualification and selection/screening procedures.

n. The confusion prevailing regarding the grant of advanced increments for M. Phil. and Ph.D. may be rectified at the earliest and the benefits be given to the teachers without any break.

o. The urgent lifting of financial blockade in the matter of granting research projects and Faculty development programmes.

**MEMBERSHIP OF NUTA:**

17. The membership of NUTA has reached 5786 by the end of the year 2019. This year the increase in membership is 46. I am glad to announce that NUTA Bulletin has completed 44th year of purposeful existence. This year we have circulated 228 pages of NUTA Bulletin. On going through the pages of the NUTA Bulletin, one finds that the Executive Committee has made an attempt to include relevant developments and documents in the bulletin and keep the members updated about the issues concerning their professional life.

18. I am grateful to media and their representatives from Nagpur, Amaravati and Gadchiroli areas for wide coverage of various events, programmes and press notes issued from time to time. This report shall not be complete unless I acknowledge the active co-operation and the support of all members of NUTA and other colleagues, as well as other members of the teaching profession at different levels to the activities of the Association; and the response given by them to various calls given by NUTA from time to time.

Yours,
Dr. Vilas B. Dhone
Secretary, NUTA

# मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांना पायदळी तुडविण्याचा अधिकार उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना कोणी दिलेला आहे ?

**प्रा.बी.टी.देशमुख**

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

**१.** नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या संदर्भात २७ जून २०१३ च्या शासननिर्णयातील वाक्यरचनेचा काय अर्थ होतो? हे ठरविण्याचा अंतिम अधिकार हा न्यायव्यवस्थेला आहे. मा. उच्च न्यायालयाने दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी Writ Petition No. 13166 of 2017 या प्रकरणात हा अर्थ स्पष्ट केलेला आहे. "सर्व प्रयोजनार्थ त्यांच्या सेवा ग्राह्य धरण्याचा निर्णय तुम्ही घेतलेला आहे आणि त्यामुळे त्यांना जुनी पेन्शन योजनाच लागू राहील व त्यासाठी त्यांच्या सेवा ह्या नेमणुकीच्या दिनांकापासूनच धराव्या लागतील," असा २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाचा अर्थ मा. उच्च न्यायालयाने या प्रकरणात स्पष्ट केला. शासन सर्वोच्च न्यायालयात गेले. सर्वोच्च न्यायालयाने Special Leave Petition (Civil) Diary No(s).14703/2019 या प्रकरणात शासनाची विशेष अनुमती याचिका फेटाळून लावली व ती फेटाळण्याचे कारण सुद्धा सांगितले. ते पुढीलप्रमाणे :- **"since the services of the first respondent were duly approved, we see no reason to entertain the Special Leave Petition.** The Special Leave Petition is accordingly dismissed."

**२.** दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी पहिल्या प्रकरणात मा. खंडपीठाने दिलेला अर्थ प्रमाणभूत मानून पुढच्या अनेक प्रकरणात मा.खंडपीठांनी आपले निर्णय दिलेले आहेत. तसे त्या प्रत्येक निर्णयात नमूद आहे. पहिल्या प्रकरणातील धोरणात्मक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने कायम केलेला असतांना, उच्च शिक्षण विभागातील अधिकारी वारंवार प्रत्येक शिक्षकाला उच्च न्यायालयात पाठवितात, हे खेदजनक आहे. एकदा सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका 'डिसमिस' केली ती उपरोक्त शब्दात. त्यानंतर शासन आणखी दोन प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात गेले. "ही विशेष अनुमती याचिका घटनेच्या १३६ कलमान्वये परवानगी देण्याच्या योग्यतेची नाही" अशा शब्दात मा. सर्वोच्च न्यायालयाने दोनही याचिका 'डिसमिस' केल्या. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामधील मूळ शब्द पुढीलप्रमाणे :-**"We are not inclined to entertain the Special Leave Petition under Article 136 of the Constitution of India.** The Special Leave Petition is accordingly dismissed."

**३.** मा. उच्च न्यायालयाच्या नऊ खंडपीठांनी एकसारखे जुन्या पेन्शन योजनेच्या बाजूने निर्णय दिले. सर्वच्या सर्व म्हणजे तीनही प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका फेटाळून लावल्या. उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचे वर्तन मात्र न्यायालयांच्या निर्णयांचा उघड-उघड अवमान करण्याच्या दिशेने चालूच आहे. कसे ते पाहू. अमरावती विभागामध्ये एकाही नेट-सेट मुक्त शिक्षकाला डिसेंबर २०१८ पर्यंत जुनी पेन्शन योजना नाकारण्यात आलेली नव्हती. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी निरनिराळ्या महाविद्यालयांना भेटी दिल्यानंतर मिळालेल्या माहितीप्रमाणे उच्च शिक्षण सहसंचालकांनी अशी एकूण २३ नेट-सेट मुक्त शिक्षकांची प्रकरणे जुन्या पेन्शन योजनेसाठी मान्य करून अे.जी कडे पाठविली व या २३ शिक्षकांना आजही जुनी पेन्शन योजना सुरू आहे. संघटनेच्या वतीने मा. नागपूर खंडपीठासमोर दाखल केलेल्या एका याचिकेमध्ये या २३ शिक्षकांची यादी जोडलेली आहे. सुरूवातीला अ.न. त्यानंतर नेट-सेट मुक्त शिक्षकाचे नाव त्यानंतर (महाविद्यालयाचे नाव) त्यानंतर नेमणुकीची तारीख व शेवटी (निवृत्तीची तारीख) या क्रमाने ही यादी पुढीलप्रमाणे :-

**(1)** Smt. Rekha Bagde (H.V.P.M. Amravati) 01.02.1993 (31.03.2016) **(2)** Shri. S. G. Sharma (H.V.P.M. Amravati) 01.02.1993 (31.07.2016) **(3)** R. S. Sontakke (R.D.I.K. College, Badnera) 01.03.1993 (30.09.2015) **(4)** Smt. Kiran K.Tamboli (Lokmanya Tilak Mahavidyalaya, Wani) 28.09.1993 (31.03.2010) **(5)** Sau. Asha D. Dev (Babaji Date Mahavidyalaya, Yavatmal) 01.10.1993 (30.11.2010) **(6)** T. S. Rahulgade (B. B. Kala Vanijya Mahavidyalay, Digras) 01.10.1993 (30.04.2014) **(7)** S. R. Dighade (R.D.I.K. College, Badnera) 18.11.1993 (31.12.2017) **(8)** Anilkumar V. Tayade (Shivaji Mahavidyalaya, Akot) 28.11.1993 (31.08.2017) **(9)** Shri. Dilip V. Alone (Lokmanya Tilak Mahavidyalaya, Wani) 01.01.1994 (30.06.2017) **(10)** G. J. Badki (Kala Vanijya Mahavidyalaya, Maregaon) 14.09.1995 (30.06.2015) **(11)** Urmila J. Shukla (Kala Vanijya Mahavidyalaya, Bori Arab) 24.01.1996 (31.08.2006) **(12)**Prof. M. R. Dongare (C. M. Kadhi Mahavidyalaya, Achalpur) 12.08.1996 (30.08.2018) **(13)** L. Shaileja Abraham (Lokmanya Bapuji Ane Maha. Yavatmal) 28.12.1996 (20.06.2013) **(14)** Tatya D. Ghadle (Kala Vanijya Mahavidyalaya, Ralegaon) 17.11.1997 (26.07.2012) **(15)** Prof. S.N.Nagare (Bhagwan Baba Mahavidyalaya, Lonar) 01.12.1997 (12.12.2014) **(16)**Shri. M. J. Chaudhari (Vidyabharati Mahavidyalaya, Amravati) 01.12.1997 (31.08.2017) **(17)** Dr.R.S.Jadhav (Amolakchand Mahavidyalaya, Yavatmal) 01.01.1998 (31.01.2016) **(18)** Dr. Asha Deshmukh (Loknayak Bapuji Ane Maha. Yavatmal) 07.05.1998 (30.04.2014) **(19)** Sau. S.D. Kondolikar (Innani Mahavidyalaya, Karnja Lad) 01.07.1998 (31.05.2017) **(20)** Shaileja M. Ranade (Babaji Date Mahavidyalaya, Yavatmal) 22.12.1999 (31.01.2011) **(21)** Dr. N.G. Mehre (Babaji Date Kala Maha. Yavatmal) 22.12.1999 (30.06.2016) **(22)** Dr. S. P. Natthani (Sitabai Kala Mahavidyalaya, Akola) 01.01.2000 (31.01.2013) **(23)** S. W. Bhaware (R.L.T. College, Akola) 09.03.2000 (28.02.2018)

**४.** मा. उच्च न्यायालयाचा पहिला निर्णय होईपर्यंत एकाही शिक्षकाला अमरावतीच्या सहसंचालकांनी जुन्या पेन्शन योजनेपासून वंचित ठेवले नाही व

*(सहपत्र : एक परिच्छेद ४ पहा)*

**महाराष्ट्र शासन**

***कार्यालय, सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग,***

व्ही.एम.व्ही. परीसर, अमरावती - ४४४ ६०४

दुरध्वनी क्रमांक : ०७२१-२५३१२३५ फॅक्स : ०७२१-२५३१४५७

Email : jdheamt@yahoo.com Web : www.jdheamravati.org.in

क्रमांक - ससं/उशि/से.नि./से.पु.परत/नेटसेट/२०२०/१९१३

**दिनांक : ०२.०६.२०२०**

प्रति,

प्राचार्य,

सिताबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला जि.अकोला

**विषय :** सेवानिवृत्ती वेतन प्रकरणाबाबत. श्री. राजू रामभाऊ रणपिसे, से.नि. सहा. प्राध्या. सिताबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला

**संदर्भ :** आपले महाविद्यालयाचे पत्र क्र. सीकमअ/१८८१/२०

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, श्री.राजू रामभाऊ रणपिसे, से.नि. सहा. प्राध्या. सिताबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला यांचा सेवानिवृत्ती वेतन प्रकरणाचा प्रस्ताव कार्यालयास प्राप्त झाला आहे. **प्रस्तुत सेवानिवृत्ती वेतन प्रकरणाची पडताळणी केली असता ते नेट-सेट परीक्षा उत्तीर्ण नसल्याचे दिसून येते. याचाच अर्थ ते युजीसी/शासननिर्णय नुसार विहित शैक्षणिक अर्हता धारण करीत नाहीत. विषयांकीत प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित याचिका प्रलंबित असल्याने त्यांचे सेवानिवृत्ती वेतन प्रकरण मा. महालेखाकार कार्यालय नागपूर-२ येथे पुढील कार्यवाहीस अग्रेषित करता येत नाही.**

सबब, श्री.राजू रामभाऊ रणपिसे (से.नि. सहा. प्राध्या.) यांचा सेवानिवृत्ती वेतनाचा प्रस्ताव मूळ सेवा पुस्तकासह परत करण्यात येत आहे.

**सहपत्र :** श्री.राजू रामभाऊ रणपिसे (से.नि. सहा. प्राध्या.) यांचे मूळ सेवापुस्तक व से.नि. प्रस्ताव

**(डॉ. केशव तुपे)**

सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती

**प्रत :** श्री.राजू रामभाऊ रणपिसे (से.नि. सहा. प्राध्या.) सिताबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला यांना माहितीस्तव सादर.

उच्च न्यायालयाचा पहिला निर्णय झाला. सर्वोच्च न्यायालयात तो निर्णय कायम करण्यात आला. त्यानंतर मात्र एकामागून एक प्रस्ताव फेटाळण्याचा सपाटा अमरावतीच्या सहसंचालकांनी लावला. सन २०१९ पासून सहसंचालकांनी जुनी पेन्शन योजना नेट-सेट मुक्त शिक्षकांना लागू होत नाही, अशी भूमिका घेऊन याबाबतचे प्रस्ताव फेटाळणे सुरू केले. शेवटचे प्रकरण दिनांक २ जून २०२० रोजीच्या पत्राने **(सहपत्र : एक)** प्रा.राजू रामभाऊ रणपिसे यांचे सेवानिवृत्ती प्रकरण होय. महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे प्रस्ताव परत पाठवितांना त्यामध्ये दोन कारणे सहसंचालकांनी नमूद केली आहेत. ती पुढीलप्रमाणे:-

(१) **"प्रस्तुत सेवानिवृत्ती वेतन प्रकरणाची पडताळणी केली असता ते नेट-सेट परीक्षा उत्तीर्ण नसल्याचे दिसून येते. याचाच अर्थ ते युजीसी/शासननिर्णय नुसार विहित शैक्षणिक अर्हता धारण करीत नाहीत."**

(२) **"विषयांकीत प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रलंबित असल्याने त्यांचे सेवानिवृत्ती वेतन प्रकरण मा. महालेखाकार कार्यालय नागपूर-२ येथे पुढील कार्यवाहीस अग्रेषित करता येत नाही."**

**५.** महाराष्ट्राच्या सर्वच भागात स्थिती सारखीच आहे. उदाहरणार्थ, दिनांक २९.०९.२०२० रोजी उच्च शिक्षण सहसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी सेवादल महिला महाविद्यालय नागपूर या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना पत्र **(सहपत्र : दोन)** पाठवून डॉ.सौ.साधना भोयर, नागपूर, यांचा सेवानिवृत्ती वेतनाचा प्रस्ताव परत पाठविला. तो पुढील दोन कारणे देऊन :-

(१) **"प्रस्तुत सेवानिवृत्ती वेतन प्रकरणाची पडताळणी केली असता ते नेट/सेट परिक्षा उत्तीर्ण झाले नसल्याचे दिसून येते. याचाच अर्थ युजीसी/शासननिर्णयानुसार विहित शैक्षणिक अर्हता धारण करीत नाहीत."**

(२) **"विषयांकित प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रलंबित असल्याने त्यांचे सेवानिवृत्ती वेतन प्रकरण मा. महालेखाकार-द्वितीय, महाराष्ट्र नागपूर येथे पुढील कार्यवाहीस अग्रेषित करता येत नाही."**

**६.** याठिकाणी लक्षात ठेवण्यासारखी बाब म्हणजे दोन विभागाचे सहसंचालक तीन विशेष अनुमती याचिका मा. सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या असतांना **"जुनी पेन्शन योजना लागू करण्याची बाब सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे"** असे लेखी कळवितात याचा अर्थ काय होतो? "नेट-सेटच्या अटी पासून विद्यापीठाने व विद्यापीठ अनुदान आयोगाने व २७ जून २०१३ चा शासननिर्णय निर्गमित करून महाराष्ट्र शासनाने मुक्तता दिली आहे, त्यामुळे यांना जुनी पेन्शन योजनाच लागू होईल व त्यासाठी त्यांची सेवा नेमणुकीच्या दिनांकापासूनच धरावी लागेल" असे निर्णय मा. उच्च न्यायालयाच्या ९ खंडपीठांनी दिलेले असतांना व त्यावर मा. सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले असतांना "या शिक्षकाने नेट-सेट परीक्षा उत्तीर्ण केली नाही" असे कारण नमूद करून प्रस्ताव परत पाठविण्याचे धैर्य या अधिकाऱ्यांना येते कुठून? उच्च शिक्षण विभागातील हा सारा कारभार अराजक सदृश्य आहे.

**७.** मा. उच्च न्यायालयाचे ९ निर्णय व त्यावर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या तीन निर्णयांनी शिक्कामोर्तब केल्यानंतर दोन विभागाचे सहसंचालक सारख्याच शब्दरचनेची दोन कारणे नमूद करून जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा प्रस्ताव परत पाठवितात याचा अर्थ वरीष्ठ अधिकाऱ्यांचा समूह तोंडी आदेशाच्या आधारावर या सहसंचालकांना नाचवित आहेत असा होतो. **"मा.उच्च न्यायालयाचे व सर्वोच्च न्यायालयाचे आदेश झाले असले तरी त्याप्रमाणे कारवाई करण्याची आवश्यकता नाही"** असे लेखी आदेश कोण्या अधिकाऱ्यांनी काढले असल्याचे आढळून येत नाही. तोंडी आदेश दिल्यामुळे न्यायालयीन अवमानाची जबाबदारी आपल्यावर येत नाही व आपल्याला पाहिजे ते तोंडी आदेशाने करवून घेता येते हे उच्च शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे वर्तन अत्यंत उथळपणाचे व अशोभनिय असे प्रशासकीय वर्तन होय. कारण या प्रत्येक प्रकरणांत विभागाचे सचिव हे क्रमांक एकचे प्रतिवादी आहेत, याचा विसर त्यांना पडता कामा नये.

**८.** विभागाचे मंत्रिमहोदय या सर्व प्रकाराकडे अत्यंत उथळपणे पहात आहेत, असे दिसून येते. दिनांक ५ मार्च २०२० रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी झालेल्या चर्चेच्या वेळी **"धोरणात्मक शासननिर्णय"** निर्गमित करण्याचे त्यांनी मान्य केले. पण त्यानंतर सहा-सात महिन्यांचा काळ उलटून गेला, पण त्यावर कोणतीच कारवाई झाली नाही. या सभेचे कार्यवृत्त महासंघाने अनेकदा मागणी केल्यानंतरसुद्धा व आजही तयार झालेले नाही. सभेचे कार्यवृत्त तयार न करण्यामागे **"अशा सभा निरर्थक असतात"** असे प्रदर्शित करणारे अधिकाऱ्यांचे वर्तन मा. मंत्रिमहोदयांच्या पाठिंब्याने आहे की, त्यांचे या कामाकडे होत असलेले दुर्लक्ष त्यास कारणीभूत आहे, हे शिक्षकांना व महासंघाला कळू शकलेले नाही. दिनांक १५ ऑक्टोबर २०२० रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी जी चर्चा-बैठक झाली, त्या बैठकीच्या सुरुवातीला अध्यक्षस्थानी स्वतः मा. मंत्रिमहोदय होते. हा विषय चर्चेला आला त्यावेळी मा.मंत्रिमहोदय बैठक सोडून निघून गेले होते. न्यायालयाच्या घोर अवमानाचे कृत्य अंतर्भूत असलेल्या या विषयाचे महत्त्व लक्षात न आल्यामुळे ते बैठक सोडून गेले की, खरोखरच त्यांना बाहेर काही महत्त्वाचे काम असल्यामुळे ते निघून गेले, हे शिक्षकांना व महासंघाला कळू शकले नाही. हा विषय चर्चेला आला त्यावेळी संचालक उच्च शिक्षण हे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. या प्रश्नावर त्यांनी वापरलेली दोन वाक्ये न्यायालयाच्या निर्णयाविषयी घोर अज्ञान प्रदर्शक होती. महासंघाचे सरकार्यवाह प्रा.लवांदे यांनी याचिका क्रमांकासह हे अज्ञान लक्षात आणून दिले. त्यावर अध्यक्ष काहीच बोलले नाहीत. "पहावे लागेल" एवढेच शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडले. **"अशा बैठका निरर्थक असतात"** हे दाखविण्याचा अधिकाऱ्यांच्या हाती उपलब्ध असलेला हुकमी उपाय म्हणजे अशा बैठकीचे कार्यवृत्तच तयार न करणे हा होय. त्या उपायाचा वापर त्यांनी सुरूच ठेवलेला आहे. **'सत्य कार्यवृत्त'** तयार झाल्यास अधिकारी **'उघडे'** पडतात. या व्यथेपासून बचाव करण्याचा या अधिकाऱ्यांना उपलब्ध असलेला रामबाण उपाय म्हणजे **"कार्यवृत्त तयार न करणे"** किंवा **"थातूर मातूर कार्यवृत्त तयार करणे"** हा होय. खुद्द सचिवांना, मंत्र्यांनी बोलाविलेल्या अशा बैठकीला हजर राहणे आवश्यक वाटत नाही. याचे मर्म मा.मंत्रिमहोदयांना कळत नसेल असे म्हणावे काय?

**९.** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे पालनसुद्धा शासन करीत नाही, अशा स्थितीमध्ये शिक्षकांच्या संघटना ठामपणे या शिक्षकांच्या पाठीशी असून आतापावेतो ९ प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांचे निर्णय या शिक्षकांच्या बाजूने झालेले आहेत. दोन प्रकरणी अंतिम निर्णय झालेले नसले तरी **"अधिकाऱ्यांना धारेवर धरणारे आदेश" मा. उच्च न्यायालयाने पारित केलेले आहेत.** त्याशिवाय संघटनांच्या मार्गदर्शनाखाली जवळजवळ अर्धा डझन याचिका मा. उच्च न्यायालयात आणखी दाखल झालेल्या आहेत.

**१०.** वेळोवळी करावयाच्या उपाययोजनेबाबत संघटनेने व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी व्यथित शिक्षकांना मार्गदर्शन केले आहे. दिनांक १ नोव्हेंबर २०२० रोजी झालेल्या संघटनेच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीमध्ये याबाबत करावयाच्या उपाययोजनेचे स्वरूप निश्चित करण्यात आलेले आहे. ढोबलमानाने कोरोना काळात या उपाययोजनांचे स्वरूप पुढीलप्रमाणे असेल. :-

**(A)** जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा प्रस्ताव विभागीय सहसंचालकांनी महाविद्यालयाकडे परत पाठविल्याबरोबर संबंधित शिक्षकांनी आपल्या प्राचार्यामार्फत विभागाचे सचिव व विभागीय सहसंचालकांना एक "नोटीस-निवेदन" सादर करावे.

**(B)** त्या निवेदनात मा. उच्च न्यायालयाचे पुढील नऊ निर्णय त्यांच्या लक्षात आणून द्यावेत.

| Sr. No. | Case No. | Order Date |
|---|---|---|
| 1. | W.P.13166/2017 (Bombay) | 03.10.2018 |
| 2. | W.P.1219/2017 (Bombay) | 19.10.2018 |
| 3. | W.P. 1304/2016 (Aurangabad) | 12.12.2018 |
| 4. | W.P. 755/2019 (Bombay) | 09.04.2019 |
| 5. | W.P. 3293/2019 (Aurangabad) | 18.06.2019 |
| 6. | W.P. 2068/2019 (Nagpur) | 29.07.2019 |
| 7. | W.P. 11316/2015 (Aurangabad) | 28.08.2019 |
| 8. | W.P. 7375/2019 (Nagpur) | 09.07.2020 |
| 9. | W.P. 7395/2019 (Nagpur) | 09.07.2020 |

**(C)** या नोटीस निवेदनातून मा. सर्वोच्च न्यायालयाचे पुढील तीन निर्णय त्यांच्या लक्षात आणून द्यावेत. :-

| Sr. No. | Case No. | Order Date |
|---|---|---|
| 1. | S.L.P (Civil) Diary No. 14703/2019 | 01.07.2019 |
| 2. | S.L.P (Civil) Diary No. 1076/2020 | 07.02.2020 |
| 3. | S.L.P (Civil) Diary No. 1309/2020 | 17.02.2020 |

**(D)** पुढील दोन याचिका न्यायालयात पेन्डींग आहेत. :-

| | | |
|---|---|---|
| 1. | W.P. 1045/2020 (Nagpur) | Pending |
| 2. | W.P. St. No. 9649/2020 (Nagpur) | Pending |

या दोन याचिका न्यायालयात पेन्डींग असल्या तरी अधिकाऱ्यांबावत अत्यंत कठोर आदेश न्यायालयाने पारित केलेले आहेत. याचा आपण अभ्यास करावा,

असे नोटीस निवेदनात नमूद असावे.

**(E)** या सर्व घडामोडी लक्षात आणून देऊन आपण आपले पत्र रद्द करून माझे पेन्शन प्रकरण पुढे पाठवावे, अशी विनंती करावी.

**(F)** इतक्या उपर यथोचित कारवाई न झाल्यास मा. उच्च न्यायालयासमोर याचिका दाखल करावी. या याचिकेतील प्रार्थना खंड ढोबळमानाने पुढीलप्रमाणे असावा :-

**PRAYER**

It is, therefore, most humbly and respectfully prayed that this Hon'ble Court may kindly be pleased to issue suitable writ, order or direction and be pleased to……

(a) quash and set aside the impugned order dated ..... passed by the respondent no.2- the Joint Director of Higher Education, ....... Division,

(b) hold and declare that the petitioner and similarly situated non-NET/SET teachers who were appointed during 23.10.1992 to 03.04.2000 upon following due selection procedure and their services are approved by the concerned universities are entitled and eligible to get the pension upon their superannuation;

(c) command the respondent no.1- the State of Maharashtra to issue necessary directions or to take policy decision for releasing of pension upon retirement to the non- NET/SET teachers who were appointed during 23.10.1992 to 03.04.2000 and further direct him to take action in order to avoid unnecessary litigations in the interest of justice;

(d) command the respondent authorities to follow the judgments passed by this Hon'ble Courts (Total 9 in Annexure) as well as of the Hon'ble Supreme Court (Total 3 in Annexure) in its letter and spirit;

(e) command the respondent authorities particularly to the respondent no.2- the Joint Director of Higher Education, ....... Division, ....... to accept the proposal of pension dated ....... and release the same in favour of the petitioner and other similar teachers within a stipulated period;

(f) grant any other relief as deems fit and proper in favour of the petitioner in the interest of justice.

**११.** प्रत्येक व्यथित शिक्षकांने धैर्याने या न्यायालयीन संघर्षाला सामोरे गेले पाहिजे. महासंघ व घटक संघटना ठामपणे त्यांच्या पाठीशी उभ्या आहेत. घटक संघटनांनी प्रत्यक्ष पेन्शन प्रकरणीच्या न्यायालयीन संघर्षात सहभाग सुरू केलेला आहे. **मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय पायदळी तुडवून या अधिकाऱ्यांना "सुखाने राज्य"करता येईल एवढा अंधार अजून पडलेला नाही, यावर सर्वांनी विश्वास ठेवला पाहिजे.**

*****

*(सहपत्र : दोन परिच्छेद ५ पहा)*

**महाराष्ट्र शासन**

**सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,**

जुने मॉरीस कॉलेज इमारत परिसर, नागपूर

Website : dirhe.in/jdnagpur Email : jdhengp@rediffmail.com

Phone No. 0712-2561713 Fax No. 0712-2554210

क्रमांक :- उशिनाग/सेवानिवृत्ती/नागपूर/३९८०/२०२०

**दिनांक : २९.०९.२०२०**

प्रति,

प्राचार्य, सेवादल महिला महाविद्यालय, नागपूर

**विषय :** डॉ. (सौ.) साधना डी. भोयर, सहाय्यक प्राध्यापिका (गृहविज्ञान)

**संदर्भ :-** आपले महाविद्यालयीन पत्र क्रमांक ५८०/२०२० दिनांक ०९.०५.२०२० या कार्यालयास प्राप्त दिनांक २९.०६.२०२०.

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, डॉ.सौ.साधना डी.भोयर, सहाय्यक प्राध्यापक, सेवादल महाविद्यालय, नागपूर, यांचा सेवानिवृत्ती वेतन मिळण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. **प्रस्तुत सेवानिवृत्ती वेतन प्रकरणाची पडताळणी केली असता ते नेट/सेट परिक्षा उत्तीर्ण झाले नसल्याचे दिसून येते. याचाच अर्थ युजीसी/शासननिर्णयानुसार विहित शैक्षणिक अर्हता धारण करीत नाही. विषयांकित प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रलंबित असल्याने त्यांचे सेवानिवृत्ती वेतन प्रकरण मा. महालेखाकार-द्वितीय, महाराष्ट्र नागपूर येथे पुढील कार्यवाहीस अग्रेषित करता येत नाही.**

सबब डॉ.सौ.साधना डी. भोयर, सहाय्यक प्राध्यापक यांचा सेवानिवृत्ती वेतनाचा प्रस्ताव मूळ सेवापुस्तकासह परत करण्यात येत आहे.

सहपत्र :- मुळसेवापुस्तक व प्रस्ताव.

**(डॉ. महेशकुमार साळुंखे)**

सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर

## *मा. उच्च न्यायालयाचा निर्णय व त्यावरील अवमान याचिकेचे तपशील*

**(१)** नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनीच पेन्शन योजना लागू करण्याच्या बाजूने झालेला मा. उच्च न्यायालयाचा तिसरा निर्णय सन २०१६ च्या याचिका क्रमांक १३०४ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक १२ डिसेंबर २०१८ रोजी दिलेला होता. *(P25NB2019)* या निर्णयाच्या परिच्छेद ३ मध्ये पुढीलप्रमाणे निष्कर्ष नमूद आहे. :- "Government Resolution dated 27th June, 2013 has been interpreted by this Court at its Principal Seat in Writ Petition No. 13166 of 2017 under order dated 03rd October, 2018. It has been held by this Court that as per the said Government Resolution, the State Government has exempted the lecturers appointed between 23rd October, 1992 to 03rd April, 2000 from possessing the NET/SET qualification."

**(२)** शासनाने त्याच उच्च न्यायालयात पूनर्विलोकन याचिका दाखल केली. त्या पूनर्विलोकन याचिकेवर कोणताही आदेश झालेला नसल्यामुळे मूळ आदेशाची अंमलबजावणी करणे शासनाला भाग असतांना जवळ जवळ २ वर्षे या प्रकरणात कोणतीही कारवाई झाली नाही. शेवटी याचिकाकर्त्यांना अवमान याचिका दाखल करावी लागली. औरंगाबाद खंडपीठापुढील सन २०१९ ची ही अवमान याचिका क्रमांक ५७२ होय. दिनांक २१ ऑक्टोबर २०२० रोजी मा. खंडपीठाने याबाबतीत पुढीलप्रमाणे आदेश पारित केले. :- "No order in review has been passed as yet. In such a case, the authorities are obligated by the dictum of the order of which contempt is impugned. In case of non-resolution of the situation in two weeks from today, the affiant who has filed reply dated 04-02-2020 in the petition to remain present before this Court. **Stand Over to 4th November 2020, in same category."**

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/078/2018-20 (Uploaded on www.nuta.in on 04.11.2020) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 15.11.2020**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---------------------------------------------------

To,........................................................................

.................................................................................

.................................................................................

.................................................................................